## नियमित दिवाणी दावा क्र. २८४/२०१३ मध्ये निशाणी क्र. ६० चे अर्जावरील आदेश

वादींतर्फे प्रस्तुतचा निशाणी क्र. ६० कडील अर्ज वादी क्र. २ यल्लाव्वा कल्लाप्पा जावीर उर्फ मांग ही दिनांक १७/०९/२०२३ रोजी मयत झाली असल्याने तिचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला दावा उपशम आदेश रद्द होऊन मिळण्याकरिता व तिचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ होऊन वारस अभिलेखावर घेण्याकरिता परवानगी मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी प्रस्तुत अर्जाला त्यांचे म्हणणे दाखल केले नाहीत. म्हणून त्यांचे म्हणण्याशिवाय प्रस्तुतचे अर्ज गुणदोषावर निकाली काढण्यासाठी विचारात घेण्यात आला.

२) सदर अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादी क्र. २ यल्लाव्वा कल्लाप्पा जावीर उर्फ मांग हिचे वारस अभिलेखावर येण्यासाठी दावा अर्जात दुरूस्ती ९० दिवसाच्या आत म्हणजे दि. १७/१२/२०२३ पूर्वी करणे गरजेचे होते. परंतु वादी हे अशिक्षित असल्याने त्यांना माहिती देणे असेते हे माहीत नव्हते. सदर कामी ०८ महिने ०३ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर विलंब हा वादींकडून जाणूनबुजून कोणतीही झालेली नाही. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने झालेला विलंब माफ होण्यास पात्र आहे. सबब, झालेला विलंब हा विलंब नसून केवळ तांत्रिक बाब आहे व झालेला उपशम रद्द होण्यास पात्र आहे. तसेच सदरची दुरूस्ती ही अपरिहार्य, तांत्रिक व कारकुनी स्वरूपाची आहे. त्यामुळे मूळ दावा अर्जाचे स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सबब, वादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफ होऊन वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी देण्यात यावी व उपशमचा आदेश रद्द करावा अशी विनंती वादींतर्फे करण्यात आलेली आहे.

३) अर्ज वाचला. वादी विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दावा, कैफियत व सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, कब्जा व दरम्यानचे उत्पप मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. स्थावर मिळकतीतील पक्षकारांचे हक्क व हितसंबंध या अनुषंगाने सदरचा दावा आहे. अर्जांचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. निशाणी क्र. ६५ कडील अ.क्र. १ कडे दाखल मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र. २ यल्लव्वा कल्लाप्पा जावीर ही दि. १७/०९/२०२३ रोजी मयत झाली असल्याची बाब स्पष्ट होते. विलंब माफीच्या अर्जातील कारणे मूळ दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी विचारात घेण्यासारखी आहेत. तसेच दावा स्थावर मिळकतीमधील हक्क व हितसंबंधाबाबतचा असल्याने मयत पक्षकाराच्या वतीने त्याचे वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क आहे. उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी, वाद विषयांची अनेकता टाळण्यासाठी तसेच प्रकरणातील गुंतागुंत टाळण्यासाठी वारस अभिलेखावर घेण्याकरिता व त्याअनुषंगाने मूळ दाव्यात दुरूस्ती करण्याकरिता परवानगी देणे न्यायाचे व गरजेचे आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून माझे असे मत आहे की, वादी क्र. २ चे बाबत दावा अवसान पावल्याचा आदेश रद्दबातल करून तिच्या वारसांना अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करून वारस अभिलेखावर घेण्यासाठी परवानगी मिळण्यासाठीचे सादर केलेले सदरचे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जांत नमूद केल्याप्रमाणे वादी क्र. २ चे असणारे वारसांना अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करण्यात यावा व दावा उपशमचा आदेश रद्दबातल करण्यात यावा.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2024.08.17 16:25:17 +0530

स्थळ:– जत (प्रकाश सी. बछले)
दिनांक :–१७/०८/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. प्रकाश सी. बछले,<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १७/०८/२०२४ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १७/०८/२०२४ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १७/०८/२०२४ |